# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०९/०८/२०२३

### प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

देशात व राज्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाचा उपक्रम संपन्न होत असताना केंद्र सरकारने **“माझी माती, माझा देश ”** या नवीन उपक्रमाची घोषणा केलेली आहे. या घोषणेनुसार प्रत्येक राज्यामध्ये, शहरांमध्ये आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी ज्या थोर स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले आहे, अशा या आपल्या देशातील मातीत जन्मलेल्या थोर स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण करण्यासाठी व आपल्या देशाच्या मातीविषयी जनजागृती, प्रेम निर्माण व्हावे यासाठी  याबाबत सदर उपक्रम दिनांक ९ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

आज दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ रोजी मा. आयुक्त, अजीज शेख, अति. आयुक्त, डॉ. करूणा जुईकर, अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर, यांच्या अध्यक्षतेखाली उपायुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे व मुख्यलेखा परिक्षक देशमुख यांच्या समवेत **“माझी माती, माझा देश”** या उपक्रमा अंतर्गत मातीचे दिवे प्रकाशित करुन महापालिका प्रगंणात “पंच प्रण” शपथ घेण्यात आली व सदर उपक्रमावर अधारित पथनाट्य सादर करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या वेळी महापालिका सचिव श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिकेतील सर्व विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम, श्रीम. श्रध्दा सपकाळे, श्रीम. निवकर, श्रीम. विशाखा सावंत, श्री. मनिष हिवरे, श्री. राजा बुलानी, श्री. विनोद केणे, श्री. जेठानंद करमचंदानी, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे व  कर्मचारी उपस्थित होते.

९/८/२३

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.